संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीर

## शिबीर अहवाल (सत्र २०१९-२०२०)

**दत्तक ग्राम वाढोणा (गा.), धामणगाव रेल्वे (दि २८ जाने. ते ४ फेब्रुवारी २०२०)**

डॉ. नरेंद्र नागपुरे ( कार्यक्रम अधिकारी )
प्रा. श्रीकांत पाटील ( सहायक कार्यक्रम अधिकारी )
डॉ. सौ. माधुरी कोपुलवार ( महिला सहायक कार्यक्रम अधिकारी )

**पर्यावरण संवर्धन, उन्नत भारत अभियान, बंधारा पाझर तलाव, प्लास्टिक निर्मुलन, झिरो वेस्ट व्यवस्थापन, स्मशान-भूमी स्वच्छता, ग्राम-स्वच्छता, वृक्ष-संवर्धन, आरोग्य, जलसंवर्धन, व्यसनमुक्ती, हागणदारी-मुक्त गाव, साक्षरता अभियान, अंधश्रद्धा निर्मुलन, एड्स जनजागृती, रस्ता सुरक्षा, महिला सक्षमीकरण, बेटी बचाव, पाणी अडवा पाणी जिरवा,** इत्यादी उद्देश घेवून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनात दत्तक ग्राम वाढोणा (गा.), धामणगाव रेल्वे येथे ८ दिवसीय राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर दि २८ जाने. ते ४ फेब्रुवारी २०२० दरम्यान डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी यांच्या नेतृत्वात व प्रा. श्रीकांत पाटील सहायक कार्यक्रम अधिकारी आणि डॉ. सौ. माधुरी कोपुलवार महिला सहायक कार्यक्रम अधिकारी यांच्या संयोजनाखाली, प्रा निलेश मोहकार, आदर्श बरवट व विशाल मोकाशे यांच्या सहकार्याने १०० स्वयंसेवकाच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.

**दि २८ जानेवारी २०२० मंगळवार** रोजी दुपारी १.४५ ला जि. प. प्राथमिक शाळा, वाढोणा ग्राम येथे विद्यार्थ्यांचे शिबीरस्थळी आगमन झाले. आगमनानंतर प्राथमिक शाळा परिसर स्वच्छ करण्यात आला. शिबिराची पूर्वतयारी, परिसर स्वच्छता, गावकऱ्यांशी चर्चा व शाळेतील मुख्याध्यापिका सौ प्रतिभा मनोहर व शिक्षक राठोड सर यांच्याशी चर्चा केली व आलेल्या शिबिरार्थींची शिबिरस्थळी नोंदणी करण्यात आली.

त्यानंतर गावच्या निवडलेल्या प्रकल्पाची पाहणी केली आणि प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी गावकऱ्यांसोबत चर्चा करून शेवटी श्रमदानाची तयारी केली.

**दि २९ जानेवारी २०२० बुधवार** रोजी सकाळी ६.३० पासून शिबिराचे पूर्ण नियमित कार्यक्रम सुरु झाले. सकाळी प्रार्थना व योगासनं झाल्या नंतर संपूर्ण गावात प्रभात फेरी काढण्यात आली व संपूर्ण गाव झाडून स्वच्छ करण्यात आले. सोबतच उन्नत भारत अभियान सर्वेक्षण शिबिरार्थींद्वारे करण्यात आले. या उपक्रमामध्ये गावातील जनतेचे सहकार्य लाभले आणि ठरवलेल्या प्रकल्प जागेवर जाऊन प्रकल्पाची कामे केली व स्वच्छता करून श्रमदानाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर उदघाटन समारंभाची संपूर्ण तयारी केली.

दुपारी ४.०० वाजता शिबिराचा **उदघाटन समारंभ** पार पडला. शिबीर उदघाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून धामणगाव एजुकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मा.श्री.प्रदीपकुमारजी लुणावत लाभले होते, तसेच शिबिराचे उदघाटन मा.डॉ अशोककुमार सकलेचा, सह-सचिव, धामणगाव एजुकेशन सोसायटी, धा. रेल्वे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. सचिन कुऱ्हेकर, विकास अधिकारी, जीवन विमा प्राधिकरण, धा. रे., डॉ विनोद देशमुख, अध्यक्ष-लायन्स क्लब, अरुण लोया, कॅबिनेट अधिकारी- लायन्स क्लब, वाढोणा येथील सरपंचा सौ. महानंदा तीतरे, उपसरपंच श्री. प्रफुल राऊत, पोलिस पाटील रुपेश तीतरे, माजी सरपंच मुरलीधरजी नारे, गावकरी व महाविद्यालयातील प्राध्यापक

वृंदांच्या उपस्थितीत उदघाटन समारंभ पार पडला. यात प्रमुख अतिथी **श्री. सचिन कुऱ्हेकर यांनी स्पर्धात्मक परीक्षेसंदर्भात** खूप सुंदर संबोधन केले. कु.इंद्रायणी ठाकरे, वृषभ ठाकरे व रेवती गीधाने यांनी तयार केलेल्या सत्र **२०१९-२० मध्ये झालेल्या विविध कार्यक्रमाचे सर्जनशीलता वापरून तयार केलेले सचित्र उपक्रम पुस्तिकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन** करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नरेंद्र नागपुरे, परिचय डॉ माधुरी कोपुलवार, आभार प्रदर्शन प्रा श्रीकांत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन कु. रेवती गीधाने व वैष्णवी ईश्वरे यांनी केले.

सायंकाळी शिबीर नियोजन सूचना करून विद्यार्थ्यांची गट विभागणी करण्यात आली. यासाठी प्रा निलेश मोहकार व गावकरी यांची प्रामुख्याने उपस्तीथी होती .

**दि ३० जानेवारी २०२० गुरुवार** रोजी सकाळी ठीक ६.३० पासून प्रार्थना व योगासनं झाली, यावेळी योग प्रशिक्षक श्री नामदेवराव भेंडे नागपूर यांनी योग विषयक मार्गदर्शन केले. ठीक ८.३० ला संपूर्ण गावात प्रभात फेरी व ग्राम स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी माजी सरपंच मुरलीधरजी नारे व डॉ राहुल चौधरी यांची विशेष उपस्तीथी लाभली. ठीक ९.३० वाजता स्वयंसेवकांची गट विभागणी करून **'उन्नत भारत अभियान अंतर्गत कुटुंब सर्वेक्षण'** करण्यात आले व सोबतच **'मिशन साहसी' महिला सक्षमीकरण कार्यशाळा कु. शिवानी मोरे, अमरावती** यांच्या मार्फत आत्म-संरक्षण करिता कराटे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कु.इंद्रायणी ठाकरे व सुयोग देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन कु.पायल गुप्ता हिने केले.

दुपार ३ वाजता च्या सत्राकरिता वक्ते म्हणून श्री विजय देशमुख अध्यक्ष, लायंस क्लब धा. रे. यांनी **'रक्तदानाचे महत्व व समाजसेवा'** या विषयावर उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला श्री चेतन कोठारी अध्यक्ष रक्तदान समिती, धा.रे. यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना संबोधताना त्यांनी रक्तदान महत्व पटवून दिले व रक्तदान जास्तीत जास्त लोकांनी करावे असे आवाहन करून रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे असे उपस्थिताना सांगितले.

तिसरे सत्र ठीक दुपारी ४.३० ला सुरु झाले त्यावेळी वक्ते म्हणून श्री चेतन पसारी यांची उपस्थिती लाभली. शरीराने अपंग असूनही त्यांनी शिबिरामध्ये एक वेगळेच वलय निर्माण केले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात गावकरी मंडळीची उपस्थिती वाखाणण्याजोगी होती. **श्री पसारीजी यांनी 'पत्रकारिता-एक संवाद'** या विषयावर प्रकाश टाकला आणि अतिशय आत्मीयतेने विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. याच दरम्यान ठीक **सायंकाळी ५.०० वाजता रा.से.यो., संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-संचालक डॉ राजेश बुरंगे यांची आकस्मिक सदिच्छा भेट** झाली व व्हील चेअर वरील चेतन पसारी यांना पाहून धामणगाव चे स्टीफन हार्किंग असे संबोधले. डॉ राजेश बुरंगे यांनी गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक यांचेशी संवाद साधला आणि नियमित कार्यक्रम पुस्तकाचे अवलोकन करून वर्षभर राबविलेल्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले व गावाला फायदा होईल अश्या प्रकल्पावर विशेष लक्ष द्यावे अशी सूचना केली. त्यानंतर रासेयो पथक, आदर्श महाविद्यालयातर्फे राबविलेला सीड बॉल उपक्रम येत्या सत्रात विद्यापीठ स्तरावर राबवू व त्यावर ३० मिनिटांची PPT Presentation व फ्लो-चार्ट महाविद्यालयातर्फे विद्यापीठात सादर करावे असे प्रतिपादन केले. त्यानंतर त्यांनी संपूर्ण शिबिराची पाहणी करून शिबिरार्थ्यांची व्यवस्था बघून त्यांना विशेष समाधान वाटले व शेवटी सायंकाळच्या प्रार्थनेला उपस्थित राहून रासेयो चमूला शुभेच्छा दिल्या.

सायंकाळी ७ वाजता **श्री राजाभाऊ पिदडी, माजी कर्मचारी, रा से यो, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व श्री राजेश कावळे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (GST), जिल्हा अमरावती, महाराष्ट्र शासन यांची सदिच्छा भेट** झाली. यावेळी दोन्ही मान्यवरांनी उपस्थित स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी कसा घडतो व कसा घडला पाहिजे यावर त्यांनी आपल्या वेगळया शैलीतून मार्गदर्शन केले व संपूर्ण शिबिरार्थ्यांना आणि उपस्थित

गावकऱ्यांना मंत्रमुग्ध केले. शिक्षण, स्पर्धा परीक्षा, शासकीय अधिकारी आणि समाज यांचे संतुलन राखण्यासाठी आपले ज्ञान विचारमंचावर प्रकट केले. मान्यवरांच्या आकस्मिक भेटी व शिबिरार्थ्यांसोबत संवादामुळे सदर दिवशीचे सायंकाळचे सत्र थोडे लांबले. गुरुदेव सेवा मंडळ, वाढोणा यांनी रात्रीच्या सत्रामध्ये भजन सादर करून शिबिराच्या वातावरणामध्ये अध्यात्मिक चैतन्य निर्माण करून दिले.

**दि ३१ जानेवारी २०२० शुक्रवार** रोजी सकाळी ठीक ६.३० पासून प्रार्थना, प्राणायाम व योगासनं झाली. ठीक ८.३० ला सकाळी सुरु झालेल्या प्रभातफेरी चे वैशिष्ट्य म्हणजे **प्रा निलेश मोहकार यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण गावात प्रभात फेरी, श्रम-दिंडी, गवळण व समाजप्रबोधनच्या** माधमातून प्लास्टिक मुक्ती, अंधश्रद्धा निर्मुलन, व्यसन मुक्ती, स्त्री-भृण हत्या या विविध विषयावर पथ-नाट्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यासोबतच लोप पावत चाललेली पारंपारीक संस्कृती व ग्रामीण भागातील मनोरंजनाचा गेली अनेक वर्षापासून वारसा जोपासत आलेली गवळण देखील या श्रम-दिंडीचा भाग होता. गावातील पुरुष व महिला भजनी मंडळ यांनी देखील मोठ्या उत्साहात श्रम-दिंडी मध्ये सहभाग नोंदविला. सोबतच वारकरी संप्रदायातील पावली नृत्य याचाही आनंद स्वयंसेवकांनी अनुभवला. यावेळी माजी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रम-दिंडीचे गावकऱ्यांनी घरोघरी रांगोळी काढून ठिकठिकाणी स्वागत व पूजन केले. यावेळी श्रेष्ठ समाजसेवक श्री त्र्यंबकराव गायकवाड प्रामुख्याने उपस्थित होते. संपूर्ण गावामध्ये स्त्री-पुरुष व बालगोपाल रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून अगदी औत्सुक्याने श्रमदिंडी मध्ये उपस्तिथी दर्शविली. शेवटी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या गजरात पावली व फुगडी खेळून श्रमदिंडीचा समारोप करण्यात आला.

दुपारच्या सत्राकरिता येणारे डॉ अविनाश असनारे काही अपरिहार्य कारणास्तव येवू शकले नाही त्या सत्रात बौद्धिक खेळ घेण्यात आले. पुढील सत्रात प्रा डॉ दत्तात्रेय रत्नपारखी, नरसम्मा महाविद्यालय, अमरावती यांनी **'पर्यावरण रक्षण- काळाची गरज'** या विषयावर उपस्थित गावकरी व स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. लहान लहान गोष्टीतून आपण पर्यावरण रक्षण करू शकतो असे त्यांनी विषद केले. अध्यक्ष स्थानी डॉ नरेंद्र नागपुरे यांनी आपण वर्ष भर रासेयो मध्ये करीत असलेले पर्यावरण रक्षणचे प्रयत्न व त्यासाठी प्रत्यक्ष कृती स्वतःपासून सुरु करण्याची गरज असल्याचे सुचविले.

संध्याकाळी ८ वाजता मनोरंजनपर **झंकार पचरंगी सांस्कृतिक कार्यक्रम श्री रिझवानोद्दिन पटेल** यांनी अप्रतिम पद्धतीने सादर केला. विशेष प्रेरणा म्हणजे हे व्यक्तिमत्व दोन्ही डोळ्यांनी अंध असूनही त्यांनी भांडे, बासरी वाजवून, विविध आवाज काढून त्यांच्या कलेने संपूर्ण वाढोणा ग्रामवासी व शिबिरार्थी भारावून गेले.

**दि १ फेब्रुवारी २०२० शनीवार** रोजी सकाळी ठीक ६.३० पासून प्रार्थना, प्राणायाम व योगासनं झाली, यावेळी **योग प्रशिक्षक श्री घनश्याम पनपालिया, धा. रे.** यांनी योगविषयक प्रात्यक्षिक सादर करून शारीरिक सुदृढतेसाठी आजकालच्या धकाधकीच्या जीवनात त्याचे अनन्य साधारण महत्व पटवून दिले. त्यानंतर ठीक ८.३० ला गावातून प्रभात फेरी करीत गावातील पश्चिम दिशेला **स्मशान भूमीवर श्रमदान** करिता सर्व शिबिरार्थी पोहचले. या ठिकाणी सर्वात आधी स्वच्छता व रंगरंगोटी करण्यात आली. कचरा, गाजर-गवत निर्मुलन, रस्ता सौंदर्यीकरण, वृक्ष संवर्धन करीत संपूर्ण स्मृती उद्यान स्वच्छ करण्यात आले. त्यावेळी गावातील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित राहून सक्रीय सहभाग दर्शविला. त्यानंतर **सचिन मून यांनी आत्मरक्षेचे धडे, लाठी-काठी, कराटे प्रशिक्षण** दिले. यामुळे विद्यार्थांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. त्यानंतर लगेच **'तरुणाई व अपेक्षित कौशल्य' या विषयावर प्रा.रुपेश डहाके** यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयीन तरुणांच्या अंगी कोणते कौशल्य असावे याविषयी त्यांनी सविस्तर संवाद साधला.

दुपारच्या सत्रात **'छत्रपती शिवरायाचे धर्म निरपेक्ष धोरण' यावर इतिहास संशोधक व लेखक डॉ प्रवीण राऊत अमरावती** यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपस्थित विद्यार्थी व गावकरी मंडळीना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी प्रा. अमोल बंड राज्यशास्त्र विभाग प्रमुख उपस्थित होते त्यांनीही अध्यक्षीय मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना

संबोधित केले. कार्यक्रमाचे संचालन कु.पायल गुप्ता तर आभार प्रदर्शन कु.वैष्णवी चहारे हिने केले. पुढील सत्रात सेवा निवृत्त नौदल अभियंता **श्री योगेंद्र कोपुलवार यांनी 'नौदल ,वायुदल, भारतीय सेना भरती - उत्तम करियर मार्ग'** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.नौदल, वायुदल, भारतीय सेना भरती हे उत्तम करियर चे मार्ग होऊ शकतात, विद्यार्थ्यांनी याकडे जाणीवपूर्वक लक्ष्य दिले तर नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात असे प्रतिपादन यावेळी कोपुलवार सरानी केले.

रात्रीच्या सत्रामध्ये कवी सम्मेलन चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये **ललित काव्य मंच, धामणगाव येथील कवी मंडळीनी आपल्या गझल व कवितांच्या** माध्यमातून उपस्थित स्वयंसेवक व गावकरी मित्राचे मार्गदर्शन, मनोरंजन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आदर्श महाविद्यालय येथील मराठी विभागाचे प्रमुख व साहित्यिक प्रा. डॉ विनायक त्रीपत्तीवार आणि प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गांडोळे यांची उपस्थिती होती. कवी मित्रा मध्ये शरद काळे, नारायण सुरंदसे, किशोर जऱ्हाड, माजी विद्यार्थी राष्ट्रपाल नाकतोडे, विशाल मोकाशे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व स्वयंसेवकांनी या सुंदर कवी सम्मेलनाचा आस्वाद घेतला. आभार प्रा श्रीकांत पाटील यांनी मानले.

**दि २ फेब्रुवारी २०२० रविवार** रोजी सकाळी ६.३० वाजता सकाळी प्रार्थना व योगासनं झाल्या नंतर संपूर्ण गावात प्रभात फेरी काढण्यात आली, त्यावेळी **से.फ.ला. शाळेची सायकल चमू** सदिच्छा भेट दिली. त्यामध्ये धामणगाव वरून सायकलने प्रामुख्याने उप-मुख्याध्यापक प्रा. मनोज हांडे, प्रा. प्रदीप मानकर, प्रा. प्रदीप तोवर व शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित झाले. सकाळी १०.०० वाजता **बी.पी. व रक्तगट तपासणी शिबीर पवन शर्मा यांचेसोबत डॉ. बुधलानी, सूक्ष्मजीव शास्त्र विभाग** यांच्या सहकार्याने संपन्न झाले. यामध्ये १०५ लोकांची तपासणी करण्यात आली. या उपक्रमामध्ये सर्व स्वयंसेवक व गावातील लोकांनी सहभाग घेतला.

दुपारच्या बौद्धिक सत्रात **प्रा.संजय नाथे, संस्थापक अध्यक्ष, रोजगार संघ, नागपूर यांनी 'ग्राम विकास, रोजगार व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन'** या विषयावर विद्यार्थी तसेच गावातील नागरिकांना मार्गदर्शन केले. यावेळी धामणगाव विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित **आमदार श्री प्रतापदादा अडसड** यांनी सुद्धा आवर्जून उपस्थित राहून विद्यार्थी व गावकरी यांना संबोधित केले. या कार्यक्रमाला गावकऱ्याची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. कार्यक्रमाचे संचालन कुमारी योगिता जांभूळकर हिने तर आभार प्रदर्शन डॉ राहुल चौधरी यांनी केले.

नंतरच्या सत्रात नेहरू युवा केंद्र अंतर्गत **'व्यावसायिक मार्गदर्शन कार्यशाळा' कु. स्नेहल बसुतकर, जिल्हा समन्वयक** यांच्या मार्गदर्शनात व प्रा. विलास नागोशे यांच्या संयोजनात घेण्यात आली. त्यानंतर **'वक्तृत्व कला व संचालन' या विषयावर विशाल मोकाशे व अध्यक्ष प्रा जितेंद्र बारूळकर यांनी कार्यशाळा** घेतली. सूत्र संचालन कसे करावे व त्याची तयारी आवाजातील चढ-उतार, विषयाचे ज्ञान, चेहऱ्यावरील हावभाव या विषयी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. यावेळी प्रा जितेंद्र बारूळकर यांनी विषयातील सखोलता व गांभीर्य आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून विषद केले. संचालन आदर्श ग्रावकर याने तर आभार दिपाली ठाकरे हिने मानले.

सायंकाळी रासेयो चमू तर्फे **सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन** करण्यात आले होते. समूह-नृत्य, एकल-नृत्य, समूहगान, नाटक इत्यादी मध्ये स्वयं सेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला गावातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात चंचल खोत, शिवानी हुन्नापुरे, सुप्रिया धोपटे, सौरभ मारवे, रिद्धी भांडे व इतर स्वयंसेवकांनी उत्कृष्ट प्रदर्शन करून प्रेक्षकांची मने जिंकली.

**दि ३ फेब्रुवारी २०२० सोमवार** रोजी सकाळी ६.३० वाजता सकाळी प्रार्थना प्राणायाम व योगासनं झाली. शिबिराच्या आयोजन पूर्वतयारी नुसार **'पाणी अडवा, पाणी जिरवा' अंतर्गत बंधारा प्रकल्पसाठी** लागणाऱ्या बाबींचा आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रकल्पाचे ठिकाण, ग्रामपंचायत प्रशासनाची मौखिक मंजुरी आणि लागणारी वेगवेगळी आवश्यक ती सामुग्री घेवून ठीक ८.३० ला गावात प्रभात फेरी करीत बंधारा तयार करण्याच्या ठिकाणावर सर्व

शिबिरार्थी पोहचले व त्यांनी अथक परिश्रम घेवून अवघ्या **२ तासात ७८ गोण्या वापरून बंधारा** तयार केला. याप्रसंगी श्री मुरलीधर नारे, डॉ राहुल चौधरी, शेखर तीतरे व रुपरावजी बुटके यांची विशेष उपस्थिती लाभली व त्यांनी बंधारा पाझर तलावाचे महत्व आणि समस्त ग्रामस्थांना होणारा फायदा यावर आपले विचार व्यक्त केले.

सायंकाळी ३.३० वाजता **समारोपीय कार्यक्रम** आयोजित करण्यात आला. या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ योगेंद्रजी गाडोळे व प्रमुख उपस्थिती रासेयो क्षेत्रीय समन्वयक डॉ स्मिता जाधव व प्रमुख पाहुणे गावच्या सरपंचा सौ. महानंदा तीतरे यांनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढविली. प्रास्ताविक डॉ नरेंद्र नागपुरे, परिचय डॉ माधुरी कोपुलवार यांनी केले. रिद्धी भांडे व सिद्धी भांडे यांनी तयार केलेल्या सत्र **२०१९-२० मध्ये झालेल्या विविध कार्यक्रमाचे प्रस्तुतीकरण सर्जनशीलता वापरून तयार केलेलं सचित्र कोलाजचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन** केले. डॉ स्मिता जाधव यांनी या शिबीर दरम्यान केलेल्या अनेक उपक्रमाचे विशेष कौतुक करून त्यांनी त्यांच्या १० वर्षाच्या कारकीर्दकाळात न सुचलेल्या गोष्टीबद्धल सांगितले. यावेळी कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात गावकरी व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद लाभले होते. प्रसंगी शिबिरातील उत्कृष्ठ विद्यार्थ्यांचा सत्कार घेण्यात आला.

या शिबिरदरम्यान व्यक्तिमत्व विकास,पर्यावरण जनजागृती,अंधश्रद्धा निर्मुलन व जनजागृती, महिला सक्षमीकरण असे अनेक उपक्रम राबविण्यात आले. शिबिराचा मुख्य प्रकल्प हा 'उन्नत भारत अभियान सर्वेक्षण' 'एक भारत श्रेष्ठ भारत' बंधारा (**'पाणी अडवा, पाणी जिरवा' अंतर्गत**),स्मशान भूमी स्वच्छता व सौंदर्यीकरण, तसेच जनजागृती व जलसंवर्धन हा होता. शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता करून त्यातून आरोग्याचा संदेश देण्यात आला. शिबिरादरम्यान रोज सकाळी ६.३० वाजता गावातून प्रभातफेरी काढून त्यात पथनाटय सादर करून गावकऱ्यामध्ये जनजागृती करण्यात येत होती.

**दि ४ फेब्रुवारी २०२० मंगळवार** रोजी सकाळी ६.३० वाजता प्रार्थना, प्राणायाम व योगासनं झाली व ग्रामस्थांशी चर्चा करून दुपारी २.३० वाजता शिबिरस्थळावरून सर्व स्वयंसेवकांनी धामणगाव कडे प्रस्थान केले. अशाप्रकारे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर दत्तक ग्राम वाढोणा (गा.) येथे संपन्न झाले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी सर्व कार्यक्रम अधिकारी, सर्व स्वयंसेवक,तेजस भागवत, कपिल निहिटे, रोशन वरठी, कुणाल हटवार, आदित्य मोहोड यांनी अथक प्रयत्न केले.

प्राचार्य

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

# आदर्श विज्ञान,ज.भा.कला,व बिरला वाणिज्य

# महाविद्यालय,धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर : दत्तक ग्राम – वाढोणा (गा.)

## अहवाल सत्र :२०१९-२०

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

| | |
|---|---|
| ESTD. 1961<br>NAAC REACCREDITED '**B++**'<br>**(CGPA 2.81)** | **ADARSHA SCIENCE, J. B. ARTS & BIRLA COMMERCE MAHAVIDYALAYA, DHAMANGAON RLY. 444709**<br>DIST. AMRAVATI (MAHARASHTRA)<br>**RUN BY DHAMANGAON EDUCATION SOCIETY**<br>AFFILIATED TO S.G.B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI<br>***NATIONAL SERVICE SCHEME*** |
| Dr. Y. B. Gandole<br>Principal | Dr. Narendra Nagpure<br>Programme Officer |

प्रति,

मा. समन्वयक,

राष्ट्रीय सेवा योजना,

सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ,

अमरावती

**विषय: राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीर अहवाल तसेच लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्याबाबत (वित्तीय वर्ष:२०१९-२०२०)**

महोदय,

आपणास वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, आमच्या महाविद्यालयाचे **राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर दत्तक ग्राम वाढोणा (गा. ) येथे दिनांक** दि २८ जाने. ते ४ फेब्रुवारी २०२० **दरम्यान आयोजित करण्यात आले. सदर विशेष शिबिराचा अहवाल लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र** आपणाकडे पाठवीत आहे.करीता आवश्यक कार्यवाही व माहितीस्तव सादर.

**धन्यवाद !**

दि.    .    .२०२०

**प्राचार्य**

**धामणगाव रेल्वे**

सहपत्र:

१. अहवाल
२. निवडक छायाचित्र
३. वृत्तपत्र कात्रण
४. शिबिरार्थी विद्यार्थी उपस्तिथी पत्रक

५. शिबीर निमंत्रण पत्रिका
६. विशेष शिबीर लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र
७. विशेष शिबिरात उपस्थित विद्यार्थ्यांची यादी.

## आगाऊ मुद्रांक पोहोच

## विशेष शिबीर कार्यक्रम

पावती लिहून देतो कि, मा. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे कडून सत्र २०१९-२०२० करिता रा. से. यो. कार्यक्रमाकरिता अनुदान प्रथम / अंतिम हप्ता प्राप्त झाला.

दिनांक: प्राचार्य

## आगाऊ मुद्रांक पोहोच

## विशेष शिबीर कार्यक्रम

पावती लिहून देतो कि, मा. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे कडून सत्र २०१९-२०२० करिता रा. से. यो. कार्यक्रमाकरिता अनुदान प्रथम / अंतिम हप्ता प्राप्त झाला.

# वृत्तपत्र कात्रण

मुलांची यादी

मुलींची यादी

वर्गनिहाय यादी

विशेष शिबीर प्रमाणपत्र

पाहुण्याचा अभिप्राय  विशेष शिबीर प्रस्ताव

विशेष शिबीर कार्यक्रम पत्रिका

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे